


दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com
RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३०३ वा मंगळवार दि १७ फेब्रुवारी २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकरांना स्थायी समितीचं सदस्यत्व नाही...

## ठाकरे गटाचा अजब निर्णय, राजकीय वर्तुळात चर्चा

**वृत्तसंस्था/मुंबई**

आर्थिक अधिकार असलेल्या स्थायी आणि नागरी सुधारणांशी संबंधित बाबींवर निर्णय घेणाऱ्या सुधार समितीवरील सदस्यांसह शिक्षण, बेस्ट समिती सदस्यांची सोमवारी मुंबई महापालिका सभागृहात निवड करण्याची प्रक्रिया पार पडली. महापौर रितू तावडे यांनी या समित्यांवरील सदस्यांच्या निवडीची घोषणा केली. मात्र, स्थायी समितीत विरोधी पक्षनेत्याला संधी न देण्याचा अजब निर्णय शिवसेना (उबाठा) पक्षाकडून घेण्यात आला. त्यामुळे गटनेत्या आणि विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांची स्थायी समितीत वर्णी लागलेली नाही. मुंबई महापालिकेच्या इतिहासात प्रथमच अशाप्रकारे विरोधी पक्षनेत्याला सदस्यत्व मिळालेले नाही. महत्त्वाची बाब म्हणजे माजी महापौर पेडणेकर यांचे सुधार समिती सदस्य म्हणूनही नाव नाही. त्यामुळे पेडणेकर यांचे विरोधी पक्षनेतेपद हे सभागृहापुरतेच मर्यादित राहिले असून, अनेक उलटसुलट चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाल्या आहेत. स्थायी समितीत अन्य पक्षांच्या गटनेत्यांची वर्णी लागली आहे. भाजपने स्थायी आणि सुधार समितीत अन्य पक्षांतून आलेल्या दोन नगरसेविकांना संधी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षामधून आलेल्या राखी जाधव यांची स्थायी समितीत, तर शिवसेना (उबाठा) पक्षातून भाजपमध्ये आलेल्या तेजस्वी घोसाळकर यांची सुधार समितीत निवड करण्यात आली आहे मुंबईचा महापौर, उपमहापौर निश्चित झाल्यानंतर आता महापालिकेच्या स्थायी, सुधार समितीवर कोणत्या सदस्यांची वर्णी लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. प्रत्येकी २६ सदस्य या समित्यांवर निवडले जातात. प्रत्येक पक्षाकडून हे नाव सुचवले जाते आणि महापौर सभागृहात त्याची घोषणा करून त्यावर शिक्कामोर्तब केले जाते. या दोन समित्यांबरोबरच शिक्षण समिती, बेस्ट समिती सदस्यांचीही निवड करण्यात आली. स्थायी आणि सुधार समितीत भाजपच्या वाट्याला प्रत्येकी दहा सदस्यत्व आली आहेत. त्यामुळे भाजपने सभागृह नेते गणेश खणकर यांनाही स्थायी समितीवर संधी दिली. महापौरपदाच्या शर्यतीत असलेल्या शीतल गंभीर आणि प्रिती सातम यांनाही भाजपने स्थायी समितीवर पाठवले आहे. याशिवाय सर्वांत वरिष्ठ नगरसेवक प्रभाकर शिंदे हेही या समितीत आहेत. शिंदे स्थायी समिती अध्यक्षपदाच्याही शर्यतीत आहेत. तर, भाजप आमदार प्रवीण दरेकर यांचे बंधू प्रकाश दरेकर आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे बंधू राहुल नार्वेकर यांनाही स्थायी सदस्यत्व दिले आहे. शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वाट्याला सात सदस्यत्व आल्याने माजी महापौर श्रद्धा जाधव यांच्यासह यशोधर फणसे, दीपमाला बढे, रमाकांत रहाटे, मीनाक्षी पाटणकर, जगदीश थैईवालापिल, लक्ष्मी भाटिया यांची निवड केली आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाला तीन सदस्यत्व मिळाल्याने गटनेते अमेय घोले




यांच्याबरोबरच माजी आमदार यामिनी जाधव आणि अंजली नाईक यांची निवड केली आहे. शिवसेनेसोबत संयुक्त गट नोंदणी केल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या सईदा खान यांनाही स्थायी समितीत संधी मिळाली आहे. काँग्रेसकडून गटनेते अशरफ आजमी, तुलिप मिरांडा, मनसेकडून गटनेते यशवंत किल्लेदार, एमआयएमकडून मोहम्मद कुरेशी यांची निवड झाली आहे.

---

# दारूच्या नशेत स्टेअरिंग? देऊळघाट मार्गावर भीषण अपघाताने खळबळ;शाळेच्या वाहनाचा थरारक प्रकार; मुलांचे जीव धोक्यात टाकले!

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा-अजंठा महामार्गावरील निवांत धाब्याजवळ आज सायंकाळी सुमारे ६.३० वाजता सुमारास भीषण अपघात घडला. देऊळघाटकडे जात असलेले शेख तौसिफ (वय ३७, रा. जळगाव, खानदेश) आणि शेख रियाज हे बुलेट दुचाकीवरून प्रवास करत असताना मागून आलेल्या मारुती इकोने जोरदार धडक दिली. या अपघातात शेख तौसिफ यांचा जागीच मृत्यू झाला असून परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. सदर इको वाहन शाळेतील सहा ते सात विद्यार्थ्यांना घेऊन देऊळघाटकडे जात होते. वाहनचालक गोविंदा तुकडोजी पसरटे हा मद्यप्राशन करून गाडी चालवत असल्याचा आरोप घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी केला आहे.



शाळकरी मुलांचे प्राण धोक्यात घालून बेदरकार वाहन चालवणाऱ्या चालकावर कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे. अपघातानंतर महामार्गावर काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा सुरू केला असून पुढील तपास सुरू आहे. निष्पाप कुटुंबावर ओढवलेल्या या दुर्दैवी प्रसंगामुळे हळहळ व्यक्त केली जात आहे.

# वासरा जपणारं घरकुल

असं विठ्ठल कामत सांगतात. मरिन लाइन्सला समुद्राला लागूनच असलेल्या सेंट जेम्स कोर्ट या हेरिटेज इमारतीत चौथ्या मजल्यावरील त्यांच्या प्रशस्त घरात या त्रिसूत्रीचा पावलोपावली प्रत्यय येतो. हे केवळ एक घर नसून, छोटेखानी वस्तुसंग्रहालयच आहे. वारशाचं इथं अतिशय मनोभावे जतन करण्यात आलंय. उजवीकडं क्वीन्स नेकलेस, डाव्या बाजूला अगदी खेटून असलेलं ब्रेबॉन स्टेडिअम , समोर एअर इंडियाच्या इमारतीपर्यंतच्या मुंबईचं दर्शन, तर मागील बाजूस नजरेच्या टप्प्यात येणारा वरळीपर्यंतचा परिसर... असं चौरंगी दर्शन घडवणारं सुमारे चार हजार चौरस फुटांचं हे प्रशस्त घर. त्यामध्ये प्रवेश करताच उजव्या भिंतीवरील नृत्याविष्कारातील गणरायाच्या दर्शनानं या लघुसंग्रहाच्या सफारीचा शुभारंभ होतो. अगदी समोरच असलेलं रंगीत नक्षीनं नटलेलं तावदान ही वास्तू ऐतिहासिक, अनोखी असल्याची साक्ष देतं. डावीकडं वळलं की, प्रशस्त दिवाणखाना. दिवाणखाना कसला वास्तूसंग्रहालयातील एक दालनच ते. वारसा जपणारं काय म्हणून नाहीय इथं? एका बाजूला ४० वर्षं जुनं टेप रेकॉर्डर-सीडी प्लेअर, शेजारीच जगभरातल्या गणेशमूर्ती, समोरच्या भिंतीवर २०० ते २५० वर्षं जुनं दुर्मीळ जपानी सात्सुमा वाझे ते मधल्या टेबलाच्या आत कासवांच्या एकाहून एक देखण्या प्रतिकृती. दिवाणखान्यात आणखी एक वस्तू खास आहे, ती म्हणजे सोफा. माजी सरन्यायाधीश वाय. व्ही. चंद्रचूड यांनी तो दिलेला. लहान असताना याच सोफ्यावर आपण खेळलो असल्याच्या आठवणीला कामत उजळा देतात. दिवाणखान्याच्या उजव्या बाजूला समोर पहिली बेडरूम. यात तीन गोष्टी खास आहेत. एक म्हणजे भारताचे पहिले बॅरोनेट सर जमसेटजी जेजीभॉय यांनी दिलेलं २५० वर्षं जुनं स्टडी टेबल व खुर्ची, सुमारे १०५ वर्षं जुना व चार पिढ्यांनी वापरलेला पलंग आणि जवळपास तितकंच जुनं सुंदर नक्षीकाम असलेलं लाकडी कपाट. दिवाणखान्याच्या डाव्या बाजूला दुसरी बेडरूम. यातही बेहराम कॉण्ट्रॅक्टर यांनी दिलेल्या ८० ते ९० वर्षं जुन्या हॅट स्टँडसह अनेक दिग्गजांनी दिलेल्या अनोख्या वस्तूंचा भरणा आहे. जुनी लोखंडी कपाटं, कॅसेट-सीडीजचा संच इथं जुन्या काळाच्या आठवणी ताज्या करतो. या बेडरूमला लागूनच आहे स्टडीरूम वजा आणखी एक बेडरूम. या बेडरूमच्या समोरच्या जागेतील कपाटामध्ये शेकडो पुस्तकं, शेजारीच १५० वर्षं जुनं ड्रेसिंग टेबल लक्ष वेधून घेतं. समोरच सर्व्हंट रूम आणि त्याच्या शेजारी स्वयंपाकघर. हे आलिशान घर कामत यांनी स्वतः विकत घेतलेलं नाही, तर वडिलांनी त्यांना ते १९८०मध्ये ङ्गगिफ्टफ केलं होतं.



वास्तू वडिलांनी दिली असली तरी त्यातील प्रत्येक वस्तू मात्र कामत यांनी आणली, जोपासली. या घराचं ठळक वैशिष्ट्य म्हणजे यात एकही नवीन वस्तू नाही. जवळपास प्रत्येक वस्तू कोणी तरी फेकून देण्यासाठी काढलेली किंवा भेट दिलेली. या वस्तूंच्या रूपानं देणाऱ्याच्या पालकांचा, त्यांच्या आजी-आजोबांचा वारसा, आठवणी आणि आशीर्वाद माझ्या घरात असल्याचं आत्मीयतेनं सांगतात. जगभरातील उत्तमोत्तर हजारो गणपती, कासवांच्या किमती प्रतिकृती, शेकडो लड्डू गोपाल, पेंटिंग, अनोखे कंगवे, कांस्याच्या वट्की, देशातल्या विविध प्रदेशांतील राण्यांच्या दिवट्या, विविध प्रकारचे सिगार पाइप त्यांच्या घरात संग्रही आहेत. कोणतीही वस्तू घरात आणणं तसं सोपं असतं, पण त्याची जपणूक करणं तुलनेनं अवघड. कामत यांच्या या मौलिक गृहसंग्रहाच्या जतनात पत्नी विद्या कामत यांचा मोलाचा वाटा असल्याचं ते आवर्जून नमूद करतात. कामत कुटुंब ३५ वर्षांहून अधिक काळ इथं राहतात. त्यांची मुलंही या दुर्मीळ वस्तूंची साफसफाई करायची, अशी आठवण विद्या सांगतात. घरात कामत यांचे दोन हळवे कोपरे आहेत. एक दिवाणखान्यातील खिडकी, जिथून समुद्र सुस्पष्ट दिसतो. या खिडकीत विद्या यांच्या वडिलांच्या हॉटेलमधलं ७९ वर्षं जुनं बाकडं आहे. दुसरा कोपरा म्हणजे पहिल्या बेडरूममधील खिडकी. इथून ब्रेबॉनवरचे क्रिकेट सामने सहज दिसतात. अगदी राजाभाई टॉवरच्या घड्याळापर्यंतचं दर्शन इथून होतं. ङ्गब्रेबॉन स्टेडिअम आणि मी जुळे भाऊ आहोतफ, असं कामत गंमतीनं म्हणतात. जगभरातील ६००हून जास्त हॉटेलांचं रूपडं पालटणाऱ्या कामत यांच्यासाठी या घराचा कायापालट करणं म्हणजे, ङ्गअगदी मनात विचार आला आणि तत्क्षणी तो अमलात आणलाफ, इतकं सोपं आहे. पण या ऐतिहासिक वास्तूला त्यांनी किंचितही धक्का लावलेला नाही. एकाहून एक सरस, अत्याधुनिक किचन हाताळलेल्या कामत यांनी या स्वयंकापघरातही अजिबात बदल केलेला नाही. अगदी कित्येक वर्षं जुनं रेफ्रिजरेटरही इथून हललेलं नाही. घर आजही घेतलेल्याच स्थितीत आहे. आवश्यकता भासली तेव्हा केवळ डागडुजी आणि रंगरंगोटी केली गेली. सतत जगभर फिरत असताना हा संग्रह, वारसा कामत यांना सातत्यानं घराची ओढ लावत असतो. ङ्गआई-वडिलांकडून मिळालेला वारसा, आपली संस्कृती, आपले रीतीरिवाज आणि आपला स्वभाव ज्या वास्तूत पाऊल ठेवल्याक्षणी प्रतिबिंबित होतो, ते ठिकाण म्हणजेच घर! आपल्या कामाव्यतिरिक्तच्या व्यक्तिमत्त्वाचं दर्शन जिथं घडतं, ते असतं आपलं घरफ, असं ते नमूद करतात.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# 'हे खपवून घेणार नाही', देवेंद्र फडणवीस हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर संतापले





**नवी दिल्ली :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतान आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यावरुन नवा वाद निर्माण झाला आहे. 'टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समकक्ष बघितलं पाहिजे', असं वक्तव्य हर्षवर्धन सपकाळ यांनी केलं आहे. हर्षवर्धन सपकाळ यांच्या या वक्तव्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर सडकून टीका केली आहे.काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची छत्रपती शिवाजी महाराजांशी तुलना करण्याचं काम जे केलं आहे ते अतिशय निंदनीय आहे. छत्रपती शिवरायांनी स्वराज्य स्थापन केलं, मोगलांच्या जोखरातून सामान्य माणसाला मुक्त करण्याचं काम केलं आणि खऱ्या अर्थाने सामान्य रयतेचं राज्य निर्माण करणारे छत्रपती शिवराय होते. त्याचवेळी हजारो, लाखो हिंदूंची हत्या करणारा टिपू सुलतान याची तुलना करुन दोघांनाही सारखा सन्मान द्या म्हणणं यापेक्षा जास्त लांगूलचालन, जोडे चाटणं मी या जन्मात बघितलेलं नाही', असा घणाघात देवेंद्र फडणवीस यांनी केला.आम्ही हे बिलकूल सहन करणार नाही. टिपू सुलतान आणि छत्रपती शिवरायांची तुलना केली याबद्दल त्यांनी माफी मागितली पाहिजे. अशा पद्धतीने जर ते बोलत असतील तर काँग्रेस पक्षामध्ये थोडी तरी नैतिकता असेल तर काँग्रेस पक्षानेदेखील कॉगनिजन्सब घेतला पाहिजे. त्यांचे जे मित्रपक्ष आहेत, त्यांनीदेखील त्यांची भूमिका यावर काय आहे? ते सांगितलं पाहिजे', अशी मागणी देवेंद्र फडणवीस यांनी केली.मला असं वाटतं की, हे कोणत्या शाळेत इतिहास शिकले याचंदेखील संशोधन केलं पाहिजे, हा जो नवा इतिहास हे लिहिताय हा इतिहास महाराष्ट्र आणि भारत खपवून घेणार नाही', असं देवेंद्र फडणीस म्हणाले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी मुलुंडला झालेल्या अपघातावरही प्रतिक्रिया दिली. 'मुलुंडमध्ये झालेला अपघात हा अत्यंत दुर्दैवी आहे. त्या ठिकाणी जे काम चाललेलं होतं, त्यामध्ये स्लॅब कोसळला. या दुर्घटनेत दुर्दैवी एका जणाचा मृत्यू झाला आहे. त्यांच्या परिवारासोबत आम्ही आहोत. त्यांच्या परिवारासोबत आमच्या प्रार्थना आहेत. जे जखमी आहेत त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्यांची सगळी काळजी एमएमआरडीए आणि राज्य सरकारच्या माध्यमातून घेतली जाईल', अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

'या संपूर्ण प्रकारात जी काळजी घेतली जायला हवी होती ती घेतली होती की नाही याची संपूर्ण चौकशी केली जाईल. अर्थात ती घेतली असती तर अशी वेळ आली नसती. यामध्ये कोण जबाबदार आहे, त्यांच्यावरही कारवाई केली जाईल आणि तात्काळ जिथे जिथे काम चाललं आहे त्याचं सेफ्टी ऑडिट करुन तात्काळ जिथे काम चालू आहे, तिथलं सेफ्टी ऑडिट करुन अशी घटना घडणार नाही यासाठी प्रयत्न केले जातील. मृतकांच्या परिवारांना शासनाच्या वतीने मदत केली जाईल', असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

## मंत्रालयातील लाच प्रकरणाने अडचणीत; झिरवळकडून विभागाला महत्त्वाचे आदेश





**मुंबई :** कार्यालयातील लिपिकाला लाच घेताना पकडल्यानंतर आता अन्न व औषध प्रशासन विभागाच्या मंत्री नरहरी झिरवळ यांनी विभागातील दक्षता पथकाला चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. लाचखोर लिपीक राजेंद्र ढेरंगे याची चौकशी करून बंद लिफाफ्यात त्याचा वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश झिरवाळ यांनी दिले आहेत.मंत्री नरहरी झिरवाळ यांनी लाचखोर ढेरंगे याची विभागातील प्रतिनियुक्ती रद्द करून पुन्हा अन्न व नागरी पुरवठा विभागात पुन्हा पाठविण्याची विनंती सामान्य प्रशासन विभागाला केली आहे. विभागातील लिपीक ढेरंगे याला गुरुवारी ३५ हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले होते. ढेरंगे याच्या अटकेनंतर विभागाचे मंत्री नरहरी झिरवळ यांच्यावर टीकेची झोड उठली असून त्यांच्यावर राजीनामा देण्याचा दबाव टाकण्यात येत आहे. दरम्यान, झिरवळ यांनी संपूर्ण प्रकरणाची गोपनीय चौकशी करण्याचे निर्देश शनिवारी दिल्याचे खात्रीलायक सूत्रांनी 'मटा'ला सांगितले. अन्न व औषध प्रशासनातील सह आयुक्त (दक्षता), पोलिस उपायुक्त यांना ही चौकशी करण्यास सांगण्यात आले असून त्याचा अहवाल बंद लिफाफ्यात लवकरात लवकर सादर करण्याचे निर्देश मंत्र्यांनी दिले आहेत. तसंच ढरंगे याची प्रतिनियुक्ती रद्द करण्याचे आदेश जारी करण्याची विनंती मंत्री झिरवळ यांनी सामान्य प्रशासन विभागाला केली आहे.माझ्या विभागातील क्लार्क लाच प्रकरणात सापडला ही माझीही जबाबदारी आहेच, ही जबाबदारी नाही म्हणून चालणार नाही. त्याने जे कृत्य केलंय, त्या कृत्याला आम्ही पाठीशी घालणार नाही. या प्रकरणाची चौकशी व्हावी आणि चौकशीत जर या प्रकरणाचे धागेदोरे माझ्यापर्यंत आले तर मी मंत्रिपदाचा राजीनामा देईन,' असं नरहरी झिरवळ यांनी स्पष्ट केलं होतं.

## भाजप उमेदवार थेट महाराष्ट्रात शिफ्ट

**हैदराबाद :** उमेदवारांची पळवापळवी होण्याच्या भितीनं भाजपनं तेलंगणात मतदान होताच वेगवान हालचाली केल्या. मंचेरीयल आणि लक्सेट्टीपेट महापालिकांसाठी बुधवारी मतदान होताच भाजपनं आपल्या उमेदवारांनी चंद्रपूर शहरात आणलं. तिथल्या हॉटेलांमध्ये त्यांची सर्व व्यवस्था केली. या महापालिकांचा निकाल काल जाहीर झाला आहे.तेलंगणात काँग्रेसची सत्ता आहे. तेलंगणातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल कालच जाहीर झाले. तिथे सत्ताधाऱ्यांकडून उमेदवार पळवले जाण्याच्या भीतीनं भाजप नं चंद्रपुरातील भाजप नेत्यांची मदत घेतली. मंचेरीयल आणि लक्सेट्टीपेट महापालिकांची निवडणूक लढवलेल्या भाजपच्या उमेदवारांची सोय चंद्रपुरातील हॉटेलात करण्यात आली. बुधवारी रात्रीच उमेदवारांना चंद्रपुरातील हॉटेलात आणण्यात आलं होतं.मंचेरीयल आणि लक्सेट्टीपेट महापालिकांचे निकाल काल जाहीर झाले. मंचेरीयलमध्ये काँग्रेसनं मुसंडी मारली. राज्यात सत्तेवर असलेल्या काँग्रेसनं मंचेरीयलमध्ये एकहाती सत्ता मिळवली. काँग्रेसनं ४४ जागांवर विजय मिळवला.

## मंत्रिपद काय चाटायचंय का? गणेश नाईकांचा एकनाथ शिंदेंवर संताप





**मुंबई :** भाजप नेते, वनमंत्री गणेश नाईक आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील वाद पुन्हा एकदा समोर आला आहे. 'मला लाज वाटते, ज्या मंत्रिमंडळात मी आहे, त्यातील नगरविकास विकास खात्याच्या लोकांनी अशा प्रकारचं कर्मदरिद्री काम केलं आहे. माझा राग शांत करायचा असेल, तर सर्व भूखंड परत करा' अशा शब्दात नाईकांनी अप्रत्यक्षपणे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर शरसंधान साधलं आहे. मी जर नवी मुंबईकरांसाठी चांगलं काम केलं नाही, तर मंत्रिपद काय चाटायचं आहे का? असा सवाल गणेश नाईक यांनी उपस्थित केला. वाशीत झालेल्या जनता दरबारात गणेश नाईक यांनी सिडको आणि महापालिका अधिकाऱ्यांवरही ताशेरे ओढले.नवी मुंबईकरांच्या सुविधेसाठी भूखंड मागितले होते, ते बिल्डरांच्या घशात घातले जात आहेत. नगर विकास खात्यातील लोकांनी हा कर्मदरिद्रीपणा केला आहे, जर चांगलं काम केलं नाही, तर मंत्रिपद चाटायचं आहे का? असा सवाल गणेश नाईक यांनी केला.हॉस्पिटल, शाळा, बागांसाठी भूखंड मागितले ते दिले नाहीत. काही दलालांनी ते बिल्डरांच्या घश्यात घातले. मला या गोष्टीची लाज वाटते, की ज्या मंत्रिमंडळात मी आहे, त्यातल्या नगर विकास विभागाच्या लोकांनीच असला कर्मदरिद्रीपणा केला आहे. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगणार आहे, की तुमची इच्छा असेल तर त्या ठिकाणी सिडको-एमआयडीसीकडून जनतेच्या हितासाठी असलेले भूखंड देण्याची व्यवस्था करा, म्हणजे माझा राग हळूहळू कमी होईल, असंही गणेश नाईक म्हणाले. ज्या गोष्टीसाठी गणेश नाईक आमदार झाला, मंत्री झाला, ते जर जनतेसाठी मी बोलू शकलो नाही, मिळवू शकलो नाही, तर ते मंत्रीपद काय चाटायचं आहे का? मंत्रिपद पक्षाने दिलं मी भारतीय जनता पक्षाचा आभारी आहे.

# १५ दिवसांत निर्णय होणार, राष्ट्रवादीत काय ठरलं?



**नवी दिल्ली :** राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह पुत्र पार्थ पवार यांनी नुकतीच उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांची दिल्लीत जाऊन भेट घेतली. या वेळी पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हेही उपस्थित होते. भेटीदरम्यान उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांनी पवार कुटुंबीयांचे सांत्वन केले आणि पुढील राजकीय कारकीर्दीसाठी शुभेच्छा दिल्याची माहिती पटेल यांनी दिली. पक्षांतर्गत बाबींवर बोलताना पटेल यांनी अजित पवार यांच्या निधनानंतर कुठलेही पाऊल हे सुनेत्रा पवार आणि कुटुंबीयांना विचारल्याशिवाय पक्षाने उचललेले नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सुनेत्रा पवार यांनीच उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रीय अध्यक्ष व्हावे, अशी भूमिका पक्षातील नेत्यांची असल्याचेही पटेल यांनी स्पष्ट केलं असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांचीच नियुक्ती येत्या १५ दिवसांत होईल, अशी माहिती प्रफुल्ल पटेल यांनी शुक्रवारी दिली.अजित पवार यांच्या निधनाच्या धक्क्यातून सावरण्यास पक्षाला बराच कालावधी लागेल; परंतु पक्षाची धुरा सुनेत्रा पवार यांनी लवकरच हाती घ्यावी अशी सर्वांचीच इच्छा असल्याचे पटेल यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी सुनेत्रा पवार यांचेच नाव असून, येत्या १५ दिवसांत हे सोपस्कार पूर्ण करण्यात येतील, असेही पटेल यांनी या वेळी स्पष्ट केले.'दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचे विलीनीकरण १२ फेब्रुवारीला जाहीर करण्याचा निर्णय शरद पवार यांच्या उपस्थितीत झाला होता. विलिनीकरणानंतर पक्षाची संपूर्ण धुरा अजितदादांकडे सुपूर्द करण्याचा निर्णयही पवार यांच्यासह सर्व नेत्यांनी केला होता,' असा गौप्यस्फोट राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केला आहे. 'राष्ट्रवादी' या पक्षाच्या मासिकात अजित पवार यांना श्रद्धांजली वाहताना लिहिलेल्या लेखात त्यांनी हे नमूद केले आहे.अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणावर बरेच दावे-प्रतिदावे केले जात आहेत. एकीकडे १२ फेब्रुवारीला विलीनीकरणाची घोषणा करण्यात येणार होती, असा दावा राष्ट्रवादी (शप) पक्षाकडून केला जात असून, दुसरीकडे त्याविषयी आम्हाला कुठलीही माहिती नव्हती, असा प्रतिदावा राष्ट्रवादीतील शीर्षस्थ नेते करत आहेत. या पार्श्वभूमीवर, 'अदृश्य शक्तींच्या कारवाया, धमक्या आणि षड्यंत्र रचून केलेले आरोप यांमुळे अजितदादांना राष्ट्रवादीतून बाहेर पडून वेगळा गट स्थापन करावा लागला होता. परंतु, झालेली चूक आता पुन्हा दुरुस्त करायची या विचाराने दादा मागील चार-पाच महिन्यांपासून कामाला लागले होते,' असे शिंदे यांनी लेखात लिहिले आहे.

# पुण्याहून महिला बहिणीच्या मुलाच्या लग्नासाठी कोल्हापूरला गेली, सोबत २८ लाखांचे दागिने..

**कोल्हापूर :** लग्न समारंभाच्या गोंधळात हॉलवरून किंवा घरातूनच चोरी होण्याच्या घटना वारंवार समोर येत असतात. कोल्हापुरात अशीच एक घटना घडली असून त्यामध्ये परगावहून आलेल्या महिलेचे सोन्याचे दागिने चोरीला गेले आहेत. घरातूनच दागिने चोरीला गेल्यामुळे ओळखीच्याच कोणी ही दागिन्यांची चोरी केल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहेत. कोल्हापुरात लग्नाच्या घाईगडबडीचा फायदा घेत चोरट्याने २८ लाख ५० हजार रुपयांच्या साडे १९ तोळ्याच्या सोन्याच्या दागिन्यांवर हात साफ केला आहे. ही घटना कोल्हापूरच्या रमणमळा पोस्ट ऑफिसजवळील एका बंगल्यात ३१ जानेवारी ते ६ फेब्रुवारी या कालावधीत घडली. शाहूपुरी पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या फिर्यादीनुसार, पुण्याहून



आलेल्या पुष्पा कुंदन राऊत (वय ४९) यांचे २८ लाखांचे दागिने तर त्यासोबतच वेदांती डोईफोडे यांचे दीड तोळ्याचे दागिने चोरले गेले आहेत. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असून, घरातील कर्मचाऱ्यांवर संशय व्यक्त केला जात आहे.पुणे येथील वानवडी येथील पुष्पा राऊत यांची बहीण उज्वला शिंदे या रमणमळा येथे वास्तव्य करतात. उज्वला यांच्या मुलाचे लग्न ७ फेब्रुवारीला होणार असल्याने पुष्पा राऊत सहकुटुंब ३१ जानेवारीला कोल्हापुरात दाखल झाल्या. त्यांनी सोबत २९ तोळे सोन्याचे दागिने आणले होते. लग्नाला आठ दिवसांचा अवधी असल्याने पुष्पा यांनी ही बॅग बहिणीची मुलगी कल्याणी भालकर यांच्याकडे लॉकरमध्ये ठेवण्यासाठी दिली. याचवेळी वेदांती डोईफोडे यांनीही आपले दीड तोळ्याचे दागिने असलेली पर्स कल्याणी यांच्याकडे सुपूर्द केली. राऊत कुटुंब लग्नाच्या काळात हॉटेलमध्ये थांबले होते. लग्नाच्या पूर्वसंध्येला पुष्पा राऊत दागिन्यांची पिशवी घेण्यासाठी बहिणीच्या घरी पोहोचल्या. लॉकरमधून पिशवी काढून लग्न समारंभासाठी निघाल्या. याचवेळी वेदांती डोईफोडे यांनी आपल्या दागिन्यांची विचारणा केली, मात्र पिशवीत दागिनेच नव्हते. ही बाब लक्षात येताच घरात त्यांनी खूप शोध घेतला, तरी दागिने सापडले नाहीत. लग्न पार पडल्यानंतर शुक्रवारी (१३ फेब्रुवारी) पुष्पा राऊत यांनी शाहूपुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पुष्पा राऊत यांचे २८ लाख रुपयांचे दागिने लंपास झाले आहेत. यात साडेआठ तोळे वजनाचे सोन्याचे गंठण, साडेचार तोळ्याच्या चार बांगड्या, साडेतीन तोळ्याचे दोन तोडे, दीड तोळ्याचे टेम्पल हार आणि अर्धा तोळ्याची अंगठी यांचा समावेश आहे. तर वेदांती डोईफोडे यांचे १ तोळ्याचे झुमके आणि अर्ध्या तोळ्याची रिंग असे दीड तोळ्याचे दागिनेही गायब झाले आहेत. एकूण साडेएकोणीस तोळ्याच्या दागिन्यांची किंमत २८ लाख ५० हजार रुपये आहे. शाहूपुरी पोलिसांनी फिर्याद नोंदवली असून, घटनास्थळाची पाहणी केली आहे.

## दारु प्यायले, स्वयंपाकावरुन जोरदार वाद, संतापात रुममेटला संपवलं ; पुणे हादरलं..

**पिंपरी-चिंचवड :** खेड तालुक्यातील नाणेकरवाडी परिसरात अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका मित्राने दुसऱ्या मित्राची चाकूने वार करून हत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी दक्षिण चाकण पोलीस स्टेशन यांनी आरोपीला अटक केली आहे. मृत व्यक्तीचं नाव किशोर सुरेश राणे असे असून, आरोपी कपिल जितेंद्र कोसलकर याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या तीन महिन्यांपासून किशोर राणे आणि कपिल कोसलकर हे दोघे योगेश दत्तात्रय नाणेकर यांच्या मालकीच्या भाड्याच्या खोलीत राहत होते. दोघेही मजुरीचे काम करत होते आणि एकत्रच राहत होते. बुधवारी सुट्टीचा दिवस असल्याने त्यांच्यापैकी एक जण घरी होता. त्यादरम्यान त्यांनी एकत्र दारू प्राशन केल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर स्वयंपाक कोणी करायचा यावरून दोघांमध्ये वाद सुरू झाला. सुरुवातीला किरकोळ असलेला हा वाद हळूहळू चिघळत गेला.वादाच्या भरात संताप अनावर झालेल्या आरोपी कपिल




कोसलकर याने स्वयंपाकघरात असलेल्या कांदा कापण्याच्या चाकूने किशोर राणे यांच्या बरगडीत आणि छातीत वार केले. गंभीर जखमी झालेल्या आणि रक्तबंबाळ अवस्थेतील राणे यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारांदरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच दक्षिण चाकण पोलीस स्टेशन चे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणी योगेश दत्तात्रय नाणेकर यांनी फिर्याद दिली असून, पुढील तपास सुरू आहे.अत्यंत किरकोळ कारणावरून घडलेली ही हत्या पुन्हा एकदा समाजासमोर गंभीर प्रश्न निर्माण करते.

## एमएमआरडीए प्रशासनाची कारवाई


**मुंबई :** आजचा दिवस मुंबईकरांना एका मोठ्या दुर्घटनेने आठवणार आहे. त्यांचे कारण म्हणजे आज मुंबईतल्या मुलुंडमध्ये एक भीषण दुर्घटना झाली. मुलुंडमध्ये मेट्रोचा काम प्रगतीपथावर आहे. पण आज एलबीएस मार्गावर मेट्रोचा पिलरचा भाग कोसळून भयानक घटना घडली आहे. या घटनेमध्ये एकाचा मृत्यू झाला तर तिघेजण जखमी झाले आहेत. या घटनेनंतर नागरिकांमधून खूप संताप व्यक्त केला गेला. तर आता यासंबंधी मोठी अपडेट समोर येते आहे. ती म्हणजे या प्रकरणात आता कंत्राटदाराला ५ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. याशिवाय जनरल कन्सल्टंटला १ कोटी रुपयांचा दंड ठोठावला गेला आहे. ही मोठी कारवाई झाल्याची माहिती आता समोर आली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त अश्विन मुगदल यांनी ही महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. त्यांनी आज दुर्घटनास्थळी भेट दिली, त्यावेळी ते पत्रकारांशी बोलले.मुगदलांनी सांगितले की, 'याप्रकरणी कोणालाही सोडले जाणार नाही, प्रकरणाची संपूर्ण चौकशी केली जाईल.

## अल्पवयीन मुलाने आयुष्याचा शेवट केला ; बुलढाण्यात नेमकं काय घडलं ?

**बुलढाणा :** बुलढाणा शहरातील एका नामांकित विद्यालयात आठव्या वर्गात शिकणाऱ्या दोन वर्ग मित्रांनी राहत्या घरात छताला गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली आहे. या घटनांनी पालकवर्गाला प्रचंड धक्का बसला आहे. अवघ्या १४ वर्ष वयाच्या दोन विद्यार्थ्यांनी लागोपाठ दोन दिवसांच्या अंतराने असं टोकाचं पाऊल उचलल्यानं शैक्षणिक क्षेत्रही चिंतित झालं आहे.शहरातील एका नामांकित विद्यालयात आठव्या वर्गात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याने शिक्षक व शिक्षिका असलेले त्याचे आईवडील हे बाहेरगावी गेले असताना दि. ११ फेब्रुवारी बुधवारी सकाळी १० वाजता छत्रपती नगरातील आपल्या राहत्या घरी अभ्यास कक्षात छताला गळफास घेऊन आत्महत्या केली. त्या दु:खद घटनेच्या पाठोपाठ काल शनिवारी सायंकाळी ५ वाजता मृत या आधी आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्याचा वर्गमित्रच असलेल्या विद्यार्थ्याने शाळेतून परतल्यानंतर सुंदरखेड परिसरातील राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. मृत विद्यार्थ्याचे वडील कारागृह पोलीस आहेत. बुलढाण्यातील अल्पवयीन वर्गमित्र विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांनी पालकवर्गाला प्रचंड धक्का बसला आहे. या खळबळ जनक घटनांमागील कारण शोधणं हे पोलिसांसमोर मोठं आव्हान आहे.या घडलेल्या घटनांमध्ये मुख्यतः एका विद्यार्थ्याचे आई-वडील हे शिक्षक आणि सहशिक्षक असल्याचं समोर आलं आहे. तर काल घडलेल्या घटनेमध्ये विद्यार्थ्याचे वडील पोलीस विभागात कार्यरत आहे. त्यामुळे एक प्रकारे उच्चशिक्षित व घरची परिस्थिती चांगली असताना देखील हे दोन अल्पवयीन विद्यार्थी यांच्या आत्महत्येचं कारण नेमकं काय असू शकतं? हे शोधणं पोलिसांसाठी देखील एक आव्हान ठरणार आहे.राज्यात बहुतांश ठिकाणी सध्या पोलीस भरती प्रक्रिया सुरू आहे. सोबतच याकरिता सराव देखील मोठ्या प्रमाणात करावा लागत आहे. मात्र, बीड पाठोपाठ बुलढाण्यात देखील एका तरुणाचा भरती प्रक्रिया दरम्यान किंबहुना त्याची तयारी करत असताना मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. सारशिव येथे भरतीची तयारी करणाऱ्या एका तरुणाचा १२ फेब्रुवारी गुरुवारी रोजी दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडल्याने सर्वत्र शोककळा पसरली आहे.

## पुतण्यावर जडला काकूचा जीव, काकानेच लावून दिलं लग्न ; जगात चर्चा..

**लखनऊ :** व्हॅलेन्टाईनच्या दिवशी उत्तर प्रदेशच्या बागपत जिल्ह्यातील टीकरी कस्बा गावात आज एक अनोखा आणि विचित्र विवाह सोहळा संपन्न झाला आहे. या विवाह सोहळ्याची सध्या सर्वत्र चर्चा होत आहे. इथे सख्खा काकू आणि पुतण्याचा विवाह संपन्न झाला आहे. विशेष म्हणजे काकानेच पुतण्याच्या हातात काकीचा हात सोपवला आहे. गावकऱ्यांच्या सल्ला-मसलतीने हा विवाह सोहळा पार पडला. लग्नानंतर दोघांना गावातून दुसरीकडे रवाना करण्यात आलं. या विवाहानंतर काकाने धक्कादायक वक्तव्य केलं आहे. आपली आणि मुलांचा जीव वाचवण्यासाठी आपण हा निर्णय घेतल्याचं काकाने सांगितलं आहे. कस्बा निवासी येथील पूजा आणि तिचा



पुतण्या संजीव हे गेल्या पाच वर्षांपासून एकमेकांच्या प्रेमात होते. त्यांच्या या प्रेम प्रकरणाची गावात सर्वत्र चर्चा होती. या प्रेम प्रकरणावरुन त्यांना अनेकदा टीकेला सामोरं जावं लागलं. अनेकांनी त्यांना ओरडा देखील दिला होता. पण विषयाला विराम लागत नसल्याने आता वाद करुन उपयोग नसल्याचं संयमाने परिस्थिती हाताळण्यात आली. या जोडप्यानेदेखील कुणालाही थारा दिला नाही. विशेष म्हणजे महिलेच्या लग्नाला आठ वर्ष झाले आहेत. तिला दोन मुलं आहेत. एक मुलगा पाच वर्षांचा आहे तर दुसरा तीन वर्षांचा आहे.काकी आणि पुतण्या यांच्यातील प्रेम प्रकरणामुळे सुरु असलेला वाद अखेर शुक्रवारी पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचला. महिलेचा पती तिला आणि पुतण्यासह गावातील काही महत्त्वाच्या नागरिकांना घेऊन पोलीस ठाण्यात दाखल झाले होते. यावेळी पोलिसांनी सांगितलं की, दोन्ही जण आपल्या मनाने कुटुंब आणि गावापासून दूर जात आहेत. ते कुठे बाहेर जावून मजुरी करुन एकत्र राहतील. त्यामुळे दोघांचं लग्न लावून देण्यात आलं. पतीसमोर महिलेने पुतण्याच्या गळ्यात वरमाळा घातली. त्यानंतर दोन्ही जण गाव सोडून दुसरीकडे निघून गेले.या लग्नानंतर महिलेच्या पतीने गंभीर आरोप केले आहेत. 'मला भीती वाटायला लागली होती. गेल्या पाच वर्षांपासून प्रत्येक दोन-तीन महिन्यांनी त्यांच्या कूकृत्यांमुळे घरात भांडण व्हायचं. गावातील लोकांनी दोघांना खूप समजावलं होतं. पण त्यांनी कुणाचच ऐकलं नाही. एकदा तर चक्क मला विष देण्याचा प्रयत्न करण्यात आला. पत्नीने मला मारुन टाकलं असतं. तिचा काही भरोसा नव्हता. माझ्या आणि मुलांच्या सुरक्षेसाठी मला हा निर्णय घ्यावा लागला', असा दावा महिलेच्या पतीने केला.

# महाशिवरात्रीस भारतीय संघांचे विजयी तांडव

## भारताच्या वादळात पाकिस्तान उडाला; गोलंदाजीपुढे अख्खा संघ धडाधड गडगडला..

**कोलंबो/वृत्तसंस्था :** रविवारी महाशिवरात्रीच्या पावनपर्वादिवशी भारताच्या तीन क्रिकेट संघांनी विजयी तांडव करीत हे पर्व जोरदार पद्धतीने साजरे केले. एकाच दिवशी तीन विजय मिळिवण्याचा भारताने अभूतपूर्व पराक्रम केला. पुरुष संघाने टी-२० विश्वचषक स्पर्धेत पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानला ६१ धावांनी धूळ चारत आपला वरचष्मा कायम राखला तर बँकॉकमध्ये सुरू असलेल्या महिलांच्या टी-२० आशिया चषक रायजिंग स्टार्स स्पर्धेत भारत महिला अ संघाने पाक महिला अ संघावर ९३ धावांनी दणदणीत विजय मिळिवला आणि हरमनप्रीत कौरच्या राष्ट्रीय महिला संघाने सिडनीतील पहिल्या टी-२० सामन्यात यजमान ऑस्ट्रेलियाचा २१ धावांनी धुव्वा उडवित विजय साकार केल्यानंतर देशभर विजयोत्सव साजरा करण्यात आला.

कोलंबोतील आर. प्रेमदासा स्टेडियम वर महाशिवरात्रीचा मुहूर्त आणि समोर पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानः अशा हायव्होल्टेज वातावरणात टीम इंडियाने आपलाच डंका वाजवला. रविवारी झालेल्या टी-२० विश्वचषकातील रोम ांचक थरारात सूर्यकुमार यादवच्या यंग ब्रिगेडने पाकिस्तानचा ६१ धावांनी धुव्वा उडवला. या विजयासोबतच भारताने दिमाखात सुपर-८ मध्ये धडक मारली आहे. या पराभवाचा दणका पाकला बसला असून विश्वचषकातील त्यांच्या आशा अधांतरी आहेत. अ गटात भारत ६ गुणासह अव्वलस्थानी असून अमेरिकन संघ ४ गुणासह दुसऱ्या, पाकचा संघ तिसऱ्या स्थानी आहे. प्रथम फलंदाजी




करताना भारतीय फलंदाजांनी पाकिस्तानी गोलंदाजीची पिसे काढली. ईशानने ४० चेंडूत १० चौकार आणि तीन षटकारांसह ७७ धावा केल्या, तर कर्णधार सूर्यकुमार यादवने २९ चेंडूत तीन चौकारांसह ३२ धावा केल्या. यामुळे भारताने निर्धारित २० षटकांत ७ गड्यांच्या मोबदल्यात १७५ धावांचा आव्हानात्मक डोंगर उभा केला. १७६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवात अत्यंत खराब झाली. भारतीय गोलंदाजांच्या भेदक

माऱ्यासमोर एकाही पाकिस्तानी फलंदाजाला तग धरता आला नाही. संपूर्ण संघ १८ षटकांत अवघ्या ११४ धावांत गारद झाला. ६१ धावांच्या या मोठ्या विजयाने भारताच्या नेट रनरेटमध्ये मोठी सुधारणा झाली आहे. लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानने पहिल्या दोन षटकांत ३ फलंदाज गमावले. हार्दिक पंड्याने पहिला धक्का दिल्यानंतर बुमराहने दुसऱ्या षटकात दोन विकेट्स घेतल्या. अनुभवी फलंदाज बाबर आझम ४ धावा करून बाद झाला. तर उस्मान खानने सर्वाधिक ४४ धावा फटकावल्या. शाहिन आफ्रिदीने १९ चेंडूत नाबाद २३ धावांचे योगदान दिले. इतर फलंदाजांनी मात्र सपशेल लोटांगण घातल्याने पाकला या सामन्यात दारुण पराभवाचा सामना करावा लागला.

पाकिस्तानने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर अभिषेक शर्मा आणि ईशान किशन या जोडीने भारतीय संघाच्या डावाची सुरुवात केली. पहिल्याच षटकात पाकिस्तानी कर्णधार सलमान अली आगाने अभिषेक शर्माला खातेही उघडू दिले नाही. अभिषेक बाद झाल्यानंतर इशान किशनने तिलक वर्माच्या साथीने ८७ धावांची दमदार भागीदारी करत पाकला बॅकफूटवर ढकलले. फटकेबाजीच्या प्रयत्नात इशान ७७ धावा करून बाद झाला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच इशान अत्यंत आक्रमक मूडमध्ये दिसत होता. त्याने मैदानाचा कोणताही कोपरा सोडला नाही. अवघ्या ४० चेंडूत ७७ धावांची स्फोटक खेळी करत त्याने प्रतिस्पर्धी पाकिस्तानी संघाचे कंबरडे मोडले होते. या खेळीत त्याने १० खणखणीत चौकार आणि ३ षटकार खेचत प्रेक्षकांचा पैसा वसूल केला.

त्यानंतर सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्माने संयमी खेळी करत भारताची धावसंख्या हलवती ठेवली. या जोडीनं तिसऱ्या विकेटसाठी ३८ धावांची म हत्त्वपूर्ण भागीदारी रचली. तिलक वर्मा २४ चेंडूत २५ धावा करून परतल्यावर हार्दिक पंड्या खातेही न उघडता माघारी फिरला. त्यानंतर कर्णधार सूर्या आणि शिवम दुबेने ३३ धावांची भागीदारी करत संघाला दीडशेचा टप्पा गाठून दिला. सूर्याने २९ चेंडूत ३ चौकारांच्या मदतीने २९ चेंडूत ३२ धावांचे योगदान दिले तर शिवम दुबेने १७ चेंडूत ३ चौकार आणि




एका षटकाराच्या मदतीने २७ धावा फटकावल्या. अखेरच्या षटकात रिंकू सिंगने ४ चेंडूत एक चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ११ धावांची नाबाद खेळी करत संघाच्या धावफलकावर ७ बाद १७५ धावा लावल्या. पाककडून सईम अयूबने २५ धावांत सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. याशिवाय सलमान अली आगा, शाहीन शाह आफ्रिदी आणि उस्मान तारिक यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली.

### संक्षिप्त धावफलक

■ भारत २० षटकांत ७ बाद १५७ (इशान किशन ४० चेंडूत १० चौकार आणि ३ षटकारासह ७७, अभिषेक शर्मा ०, तिलक वर्मा २४ चेंडूत २५, सूर्यकुमार यादव २९ चेंडूत ३२, हार्दिक पंड्या ०, शिवम दुबे १७ चेंडूत २७, रिंकू सिंग नाबाद ११, अक्षर पटेल ०, सईम आयुब २५ धावांत ३ बळी, सलमान आगा, शाहिन आफ्रिदी आणि उस्मान तारीक प्रत्येकी १ बळी)

■ पाकिस्तान १८ षटकांत सर्वबाद ११४ (साहिबजादा फरहान ०, सईम आयुब ६, सलमान आगा ४, बाबर आझम ५, उस्मान खान ४४, शादाब खान १४, शाहिन आफ्रिदी नाबाद २३, हार्दिक पंड्या, जसप्रीत बुमराह , अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती प्रत्येकी २ बळी, कुलदीप यादव, तिलक वर्मा प्रत्येकी १ बळी).

## पाकिस्तानचा फॅन स्टेडियममध्येच ढसाढसा रडला, व्हिडिओ व्हायरल



**मुंबई/वृत्तसंस्था :** टीम इंडियाविरोधात दारूण पराभव झाल्यानंतर पाकिस्तानातून संतापजनक प्रतिक्रिया येत आहेत. चाहत्यांच्या संतापाचा आणि दुःखाचा बांध फुटला आहे. आर. प्रेमदासा स्टेडियमम धील एका पाकिस्तानी चाहत्याचा व्हिडिओ व्हायरल झालाय. पाकिस्तानच्या पराभवानंतर तो ढसाढसा रडत असल्याचे व्हिडिओत दिसत आहे. या कट्टर चाहत्याचा व्हिडिओ इंटरनेटवर वाऱ्यासारखा पसरला आहे. हा चाहता रडत रडत पाकिस्तानच्या संघाला पराभवाचा जाब विचारताना दिसत आहे. या चाहत्याच्या भावना आणि त्याने विचारलेले प्रश्न प्रत्येक क्रिकेट प्रेमीच्या काळजाला भिडणारे आहेत.

पराभव पाकिस्तानी चाहत्यांच्या जिव्हारी लागलाय. एका चाहत्याने रडत आपला संताप व्यक्त केला. तो व्हिडिओत म्हणतोय: 'प्रत्येक वेळी इतका त्रास का देतात? भारताकडूनच सारखं सारखं का हरता? आम्ही तुम्हाला इतकं प्रेम देतो, पण तुम्ही प्रत्येक वेळी आम्हाला दुःख देता. आमच्या प्रेमाचा तुम्ही मजाक उडवताय.' हा व्हिडिओ वाऱ्यासारखा सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. पाकिस्तानी संघाने वारंवार केलेल्या सुमार कामगिरीमुळे चाहता प्रचंड उद्विग्न झाला होता. 'प्रत्येक वेळी तुम्हाला भारताकडूनच का हरायचं असतं? प्रत्येक पाकिस्तानी नागरिकाला का त्रास देता? आम्ही तुम च्याकडून नेहमी आशा आणि अपेक्षा ठेवतो, पण तुम्ही प्रत्येक वेळी भारताकडून हरता... का?' असा सवाल चाहत्याने पाकिस्तानच्या संघाला विचारलाय. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झालाय.

## भारतीय महिलांकडून ऑस्ट्रेलियाचा पराभव


**सिडनी/वृत्तसंस्था :** भारतीय महिलांनी डीएलएस पद्धतीने ऑस्ट्रेलियाचा २१ धावांनी पराभव केला असला, तरी फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही बाजूंनी दमदार कामगिरी केली आणि रविवारी येथे त्यांच्या दौऱ्याची सुरुवात शानदार पद्धतीने केली.

सामनावीरची मानकरी अरुंधती रेड्डी (४/२२) हिने उत्कृष्ट गोलंदाजी करत ऑस्ट्रेलियाचा डाव १३३ धावांत गुंडाळला. भारतीय गोलंदाजांच्या काम गिरीमुळे ऑस्ट्रेलियाचा डाव दोन षटके शिल्लक असतानाच संपुष्टात आला. प्रत्युत्तरार्थ खेळताना जेव्हा पाऊस सुरू झाला तेव्हा उपकर्णधार स्मृती मानधना १७ चेंडूंत १६ धावांवर नाबाद होती आणि जेमिमा रॉड्रिग्जने तिला चांगली साथ दिली. पावसामुळे खेळ थांबवण्यात आला. त्यानंतर खेळ पुन्हा सुरू होऊ शकला नाही आणि ५.१ षटकात १ बाद ५० धावा करणाऱ्या भारताला विजयी घोषित करण्यात आले. ५.१ षटकांनंतर डीएलएसची आवश्यक सरासरी धावसंख्या २९ होती. ऑस्ट्रेलियाची नवीन कर्णधार सोफी मोलिनेक्सने बाद करण्यापूर्वी फटकेबाज शेफाली वर्माने तिची भूमिका बजावली आणि ११ चेंडूंत २१ धावा केल्या. प्रथम फलंदाजी करण्यास सांगितले असता ऑस्ट्रेलियाने २.२ षटकात २२ धावा केल्या होत्या. पण बेथ मुनीने (५)




रेणुका सिंगचा चेंडू उचलून मारण्याच्या प्रयत्नात चेंडूने बॅटची कड घेतली आणि कव्हरमध्ये स्मृती मानधनाला झेल पकडण्यात यश आले. दुसरी सलामीवीर, जॉर्जिया वोल (१० चेंडूंत १८) म नीपाठोपाठ लगेचच ड्रेसिंग रूममध्ये गेली. कारण क्रांती गौडच्या वाईड चेंडूवर कट फटका खेळण्याच्या प्रयत्नात तिच्या बॅटची कड लागली आणि यष्टीरक्षक रिचा घोषने झेल आरामात पकडला. एलिस पेरी (११ चेंडूंत २०) आणि फोबी लिचफिल्ड (१९ चेंडूंत २६) यांनी तिसऱ्या यष्टीसाठी ४१ धावांची वेगवान भागीदारी करून संघाचा डाव सावरला. पण त्यांची भागीदारी भारताला धोकादायक ठरत असतानाच कर्णधार हरमनप्रीत कौरच्या उत्तम काम गिरीमुळे अरुंधतीने बाजी मारली. हरम नप्रीतने मैदानात पाठीमागे धावत जाऊन एका बाजूने सूर मारत एक शानदार झेल घेतला. भारतासाठी हा एक मोठा ब्रेक होता आणि त्यानंतर त्यांनी ॲश्ले गार्डनर (४) आणि लिचफिल्डच्या रूपात आणखी दोन बळी घेतले आणि १० व्या षटकाच्या सुरुवातीला यजमान ऑस्ट्रेलियाची स्थिती ५ बाद ८० अशी करून टाकली. जॉर्जिया वेअरहॅम (१९ चेंडूंत ३०) आणि निकोला केरी (१२) यांनी सहाव्या गड्यासाठी ४१ धावांची भागीदारी करून भारतावरील दबाव काही काळ वाढविला. त्यानंतर जॉर्जिया अरुंधतीचा चेंडू हाणण्याच्या भरात चुकून बाद झाली. यामुळे ऑस्ट्रेलियाची १४ व्या षटकात ६ बाद १२१ अशी स्थिती झाली. धावसंख्या तशीच असताना केरीने कट शॉट खेळण्याचा केलेला प्रयत्न अंगलट येऊन श्रीचरणीच्या चेंडूने त्रिफळा उडविला. त्यानंतर रेणुकाच्या गोलंदाजीवर ॲनाबेल सदरलँडला घोषने शानदार पद्धतीने यष्टिचीत केले.

# 'व्हॅलेंटाइन डे'ला अपूर्वा नेमळेकरनं बांधली लग्नगाठ

**मुंबई :** 'रात्रीस खेळ चाले' या मालिकेत 'शेवंता'ची भूमिका करणारी अभिनेत्री अपूर्वा नेमळेकर विवाह बंधनात अडकली आहे. तिने सोशल मीडियावर पोस्ट करून चाहत्यांना हा सुखद धक्का दिला आहे. तिने आपल्या नवीन आयुष्याला सुरूवात केली आहे.

अपूर्वा नेमळेकरच्या नवऱ्याचे नाव तनुज गोवळकर असे आहे. आता अपूर्वा गोवळकरांची सून झाली आहे. तिने इन्स्टाग्रामवर लग्न सोहळ्याचे तीन फोटो शेअर केले आहे. या फोटोंमध्ये दोघांचा रोमॅंटिक अंदाज पाहायला मिळत आहे. या फोटोंना अपूर्वाने खूपच खास, भावनिक कॅप्शन लिहिलं आहे. ती खूपच खुश आहे. अपूर्वा आणि तनुज एका खास दिवशी लग्न केले आहे. अपूर्वा आणि तनुजचा विवाह 'व्हॅलेंटाईन्स डे'ला म्हणजेच १४ फेब्रुवारीला पार पडला. या सोहळ्याला तिचे कुटुंब आणि जवळचे मित्र मंडळी उपस्थित होते. अपूर्वाने लग्नासाठी खूपच भारी लूक केला होता. तिने हिरव्या रंगाची नऊवारी साडी नेसली होती, केसांचा बन, मराठमोळा साज श्रृंगार, हातात हिरवा चुडा आणि गळ्यात मंगळसूत्र अपूर्वा खूपच सुंदर दिसत होती. तर तनुजने पांढरा कुर्ता आणि हिरव्या रंगाचे धोतर नेसले होते. दोघांचा हा मराठमोळा पारंपरिक लूक खूपच सुंदर दिसत होता. अपूर्वा नेमळेकरचे हे दुसरं लग्न आहे.

# शाहिदच्या सिनेमाला 'व्हॅलेंटाईन डे'चा फायदा, जमवला इतक्या कोटींचा गल्ला

**मुंबई :** बॉलिवूडचा 'चॉकलेट बॉय' शाहिद कपूर आणि 'नॅशनल क्रश' तृप्ती डिमरी यांची मुख्य भूमिका असलेल्या ' ओ रोमियो ' सिनेमाची गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू होती. आता हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या सिनेमानं बॉक्स ऑफिसवर पहिल्याच दिवळी तगडी कमाई केली आहे.या चित्रपटानं व्हॅलेंटाईन डे च्या एक दिवस आधी सिनेमागृहात धडक दिली. प्रसिद्ध दिग्दर्शक विशाल भारद्वाज आणि शाहिद कपूर ही जोडी तब्बल सात वर्षांनंतर एकत्र आल्यामुळं या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता होती.समोर आलेल्या काही रिपोर्ट्सनुसार 'ओ रोमियो'नं भारतात पहिल्या दिवशी ८.२५ कोटी ते ९.०१ कोटी रुपयांची निव्वळ कमाई केली आहे. व्हॅलेंटाईन डेच्या पूर्वसंध्येला प्रदर्शित झाल्याचा फायदा चित्रपटाला मिळाला असून, सायंकाळच्या आणि रात्रीच्या शोमध्ये प्रेक्षकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. तर जगभरातील कमाईचे आणखी जास्त असल्याचं म्हटलं जातं आहे. बॉक्स ऑफिसवर डिसेंबरम ध्ये प्रदर्शित झालेला धुरंधर सिनेमा आजही चांगली कमाई करतोय. सोबतच बॉर्डर २ सिनेमाचीही स्पर्धा बॉक्स ऑफिसवर पाहायला मिळत आहे.काही रिपोर्ट्सनुसार या सिनेमाचं बजेट सुमारे १२५ - १५० कोटींचं आहे. हा चित्रपट हुसेन झैदी यांच्या 'माफिया क्वीन्स ऑफ मुंबई' या पुस्तकातील एका प्रकरणावर आधारित असल्याचे बोललं जात आहे. शाहिदसोबत या सिनेमात तृप्ती डिमरी, नाना पाटेकर, अविनाश तिवारी यांच्या भूमिका आहेत.आज 'व्हॅलेंटाईन डे' (१४ फेब्रुवारी) असल्यानं या चित्रपटाच्या कम ईत मोठी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# बिग बॉस फेम लोकप्रिय अभिनेत्रीला लॉरेन्स बिश्नोई टोळीकडून जीवे मारण्याची धमकी




**मुंबई :** गेल्या काही वर्षा सिनेइंडस्ट्रीतील कलाकारांना धमक्या येणं, त्यांच्यावर हल्ले होण्याचं प्रमाण वाढलं आहे. काही दिवसांपूर्वी अभिनेता रणवीर सिंह याला धमकीचा मेसेज आल्यानंतर आता एका लोकप्रिय अभिनेत्रीकडंही खंडणी मागण्यात आल्यानं खळबळ उडाली आहे. पंजाबी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री आणि 'बिग बॉस १३' फेम हिमांशी खुराना हिला जीवे मारण्याची धमकी देऊन १० कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या खळबळजनक प्रकारामुळं मनोरंजन विश्वात एकच खळबळ उडाल्याचं पाहायला मि ळत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हिमांशीला हा धम कीचा फोन शनिवारी १४ फेब्रुवारी रोजी आला. फोन करणाऱ्या व्यक्तीनं आपली ओळख हॅरी बॉक्सर अशी करून दिली आहे. हॅरी बॉक्सर हा कुख्यात गॅंगस्टर लॉरेन्स बिश्नोई टोळीचा परदेशातून सूत्रे हलवणारा प्रमुख सदस्य असल्याचं म्हटलं जात आहे. इतकंच नाही तर धमकी देणाऱ्यानं स्पष्टपणे सांगितलं की, जर १० कोटी रुपये दिले नाहीत, तर तिला गंभीर परिणामांना सामोरं जावं लागेल. या घटनेनंतर घाबरलेल्या हिमांशीने तत्काळ मोहाली पोलिसांत धाव घेऊन तक्रार दाखल केली.म ोहालीचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक हरमनदीप हंस यांनी या घटनेला दुजोरा दिला आहे. हिमांशी खुरानाच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे, असंही त्यांनी सांगितलंय.अभिनेत्रीच्या घराबाहेर आणि तिच्या प्रवासादरम्यान विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.ज्या नंबरवरून फोन आला होता, त्याचे कॉल रेकॉर्ड्स पोलीस तपास करत आहेत.गेल्या काही काळापासून लॉरेन्स बिश्नोई टोळीकडून बॉलिवूड आणि पंजाबी कलाकारांना लक्ष्य केलं जात आहे.काही दिवसांपूर्वीच अभिनेता रणवीर सिंह आणि दिग्दर्शक रोहित शेट्टी यांनाही अशाच प्रकारच्या धमक्या मिळाल्या होत्या. पंजाबी गायक बी प्राक यालाही या वर्षाच्या सुरुवातीला धमकीचा फोन आला होता.

# जॅकलीनला तुरुंगातून हेलीकॉप्टर गिफ्ट



**मुंबई :** अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस आता तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. अभिनेत्रीला कथित बॉयफ्रेंडने चक्क तुरुंगातून भेटवस्तू पाठवली आहे. जॅकलिन हिला बॉयफ्रेंडने तुरुंगातून आलिशान हेलीकॉप्टर भेट म्हणून पाठवलं आहे. शिवाय एक लव्हलेटर देखील पाठवलं आहे. जॅकलिन हिला लव्ह लेटर दुसरं तिसरं कोणी नाही तर, २०० कोटी रुपयांच्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी तुरुंगात असलेल्या सुकेश चंद्रशेखर याने पाठवला आहे. पत्रात सुकेश याने अभिनेत्रीचा उल्लेख 'माय बेबी बोम्माः' म्हणून केला आहे. एवढंच नाहीतर, जॅकलिन हिला जगातील सर्वात उत्तम व्हेलेंटाईन मानतो.. असं देखील सुकेश म्हणाला आहे.सुकेश याच्या पत्राची सुरुवात जॅकलिन हिच्या नावाने होते. सुकेश चंद्रशेखर म्हणाली, 'माय बेबी बोम्मा जॅकलिनः जेथे संपूर्ण जय व्हॅलेंटाईन डे साजरा करत आहे. तर मी तुझ्याशिवाय स्वतः अपूर्ण आहे आणि माझ्या मनातील वेदना इतक्या तिव्र आहेत की मी त्या व्यक्त देखील करु शकत नाही. माझ्या प्रत्येक हृदयाचा ठोक मला फक्त एकाच गोष्टीची जाणीव करुन देतो आणि ती म्हणजे, तुझ्या आणि माझ्यातील अंतरः माझ्या प्रत्येक श्वासावर तुझं नाव आहेः'सुकेश पुढे पत्रात लिहितो, 'तुरुंगाच्या या कठोर भिंतींनी मला तुझ्यापासून दूर ठेवलं आहे. वाळवंटात हरवलेल्या एका व्यक्तीप्रमाणे मला तुझी आठवण येत आहेः बेबी बोम्मा, मला तुला माझ्या जवळ घ्यायचे आहे आणि तुझ्या कानात गोड बोलायचं आहे.' सुकेश याने अभिनेत्रीची माफी देखील मागितलीः कारण सुकेश याच्यामुळे जॅकलिन हिला कायद्याच्या कचाट्याच अडकावं लागलंः

सर्वात महत्त्वाचं म्हणजे सुकेश याने जॅकलिन हिने एअरबस-एच सीरीजचे हेलिकॉप्टर व्हॅलेंटाईन भेट म्हणून दिलं आहे. सुकेश म्हणाला, 'बेबीः मी तुझ्यासाठी खास भेट पाठवलं आहे, जे तुझ्यासाठी तयार केलं आहे. जे तुझ्यासारख्या राणीसाठी परफेक्ट आहेः 'एयरबस-एच सीरीज हेलीकॉप्टर' जे आलिशान आहेः जे खास तुझ्यासाठी डिझाईन करण्यात आलं आहे. ज्यावर तुझं नाव लिहिलं आहे, गऋः' सध्या सर्वत्र फक्त आणि फक्त सुकेश याने जॅकलिन हिच्यासाठी पाठवलेल्या लव्हलेटर आणि भेटवस्तूची चर्चा रंगली आहे.

# जिल्ह्यातील हतेडी व पिंपळगाव काळे प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन पुरस्कार...

जनसंचलन/बुलढाणा

आरोग्य सेवेतील गुणवत्तेला अधोरेखित करणाऱ्या राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन() अंतर्गत बुलढाणा जिल्ह्याने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. बुलढाणा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र हतेडी आणि जळगाव जामोद तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळगाव काळे यांना राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन पुरस्कार प्राप्त झाले आहे. यापूर्वी किन्होळा, गणेशपूर आणि जानेफळ या तीन प्राथमिक आरोग्य केंद्रांना मानांकन मिळाले होते. नव्या समावेशामुळे आता बुलढाणा जिल्ह्यातील एकूण पाच प्राथमिक आरोग्य केंद्रांना राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त झाले असून ग्रामीण भागातील आरोग्य सेवेची गुणवत्ता पुन्हा अधोरेखित झाली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र हतेडीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण जवजाळ, तालुका आरोग्य अधिकारी महेंद्र सरपाते तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळगाव काळे येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. कैलास काळे व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला पाटील आणि त्यांच्या सर्व कर्मचारी वृंदाचे अभिनंदन करण्यात आले. केंद्रीय आयुष व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात घेतलेल्या आढावा बैठकीत जिल्ह्याचा राष्ट्रीय मानांकनात समावेश व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्यांच्या मार्गदर्शनानुसार संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नियोजनबद्ध कामकाज करून हे यश संपादन केल्याचे सांगितले जाते. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय आढावा बैठका नियमित घेतल्या जात आहेत. अधिकारी ते आशा सेविका अशा सर्व घटकांच्या समन्वयातून ही कामगिरी साध्य झाल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. भविष्यातही गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यावर भर राहील, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी सांगितले. मानांकन प्रक्रियेत जिल्हा गुणवत्ता आश्वासन चमूतील नोडल अधिकारी तथा जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हरी पवार, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे, जिल्हा सार्वजनिक आरोग्य परिचारिका शीतल साखळीकर, कार्यक्रम सहाय्यक अमर राठोड तसेच आधार फाउंडेशन यांनी पर्यवेक्षण करून आवश्यक सुधारणा केल्या. राष्ट्रीय मानांकनानंतर संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रांना पुढील तीन वर्षांसाठी दरवर्षी ३ लाख रुपये प्रोत्साहन अनुदान मिळणार आहे. या निधीतून रुग्ण सुविधा वाढविणे व आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या यशामुळे बुलढाणा जिल्ह्याची ओळख अधिक भक्कम झाली असून आरोग्य सेवेतील गुणवत्ता व कार्यक्षमतेचा आदर्श निर्माण झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिरात कुष्ठरोग तपासणी व जनजागृती

जनसंचलन/बुलढाणा

स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान तसेच कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र(कुसुम) विशेष सर्व्हेक्षण मोहिमेअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून बुलढाणा जिल्ह्यात कुष्ठरोग तपासणी व व्यापक जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. शिबिरात उपस्थित नागरिकांची वैद्यकीय तपासणी करण्यात आले. कुष्ठरोगाची प्रमुख लक्षणे म्हणजे त्वचेवर फिक्कट पांढरे किंवा लालसर-तांबूस रंगाचे बधिर चट्टे, तेलकट व गुळगुळीत त्वचा, भुवयांचे केस विरळ होणे, हात-पायाला मुंग्या व बधिरता, बोटे वाकडी होणे, अंगावर गाठी येणे, मज्जाबाधा आणि कानाच्या पाळ्या जाड होणे. अशी कोणतीही लक्षणे आढळल्यास नागरिकांनी न घाबरता जवळच्या आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे. कुष्ठरोगाचे निदान झाल्यानंतर सहा महिने ते एक वर्ष बहुविध औषधोपचार () दिल्यास आजार पूर्णपणे बरा होतो. उपचार न घेतल्यास हात-पायाला जखमा व कायमस्वरूपी अपंगत्वाची शक्यता निर्माण होऊ शकते. तसेच कुष्ठरुग्ण आढळल्यास त्यांच्यासोबत उठणे-बसणे, खाणे-पिणे यामुळे संसर्ग होत नाही. कुष्ठरोग असंसर्गजन्य असून रुग्णांशी भेदभाव न करता सन्मानाने वागावे आणि मानसिक आधार द्यावा, असेही स्पष्ट करण्यात आले. सन २०२७ पर्यंत कुष्ठरोग निर्मूलनाच्या शासनाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी नागरिकांनी स्वेच्छेने तपासणी करून आरोग्य सेवेला सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले.

# राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२५ साठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

जनसंचलन/ बुलढाणा

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च, २०२६ असा आहे. राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करून घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने ... या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

# जिल्हा युवा पुरस्कार: २८ फेब्रुवारीपर्यंत अर्ज आमंत्रीत

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हास्तर युवा पुरस्कार सन २०२४-२५ या वर्षाकरीता अर्ज मागविण्यात आले असून इच्छुकांनी २८ फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्याच्या युवा धोरण २०१२ नुसार जिल्हास्तरावर युवक आणि युवती तसेच संस्थेला पुरस्कार देण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचलनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत राज्याचे युवा धोरणानुसार जिल्हातील युवांनी व संस्थांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा युवा पुरस्कार प्रतीवर्षी देण्यात येत असतो. पुरस्कार जिल्हातील एक युवक, एक युवती व एक नोंदणीकृत संस्था यांना देण्यात येतो. त्याअनुषंगाने मुल्यांकनासह व पात्रतेचे निकष पुर्ण करणाऱ्या जिल्हातील युवक, युवती व संस्थांनी कार्यालयातुन अर्ज प्राप्त करुन आवश्यक कागदपत्र व शासन निर्णयानुसार प्रस्ताव सादर करावा. तसेच युवक - युवतीचे पोलीस चारित्र्य प्रमाणपत्र व संस्थेसाठी प्रस्ताव सादर करणाऱ्यांनी सर्व सदस्यांचे पोलीस चारित्र्य प्रमाणपत्रासह आपला परिपुर्ण प्रस्ताव दि. २८ फ ेब्रुवारी २०२६ पर्यंत दोन प्रतीत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, जांभरुन रोड, बुलडाणा येथे सादर करावा. अधिक माहितीकरीता कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष कार्यालयात संपर्क साधावा, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी कळविले आहे. युवक व युवतींसाठी पात्रतेचे निकष : युवक किंवा युवतीचे वय पुरस्कार वर्षातील १ एप्रिल रोजी १३ वर्ष पुर्ण व ३१ मार्च रोजी ३५ वर्षापर्यंत असावे. (तसा पूरावा जोडावा), जिल्हा पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराचे त्या जिल्हात सलग पाच वर्ष वास्तव्य असावे. (दाखला जोडावा), पुरस्कार व्यक्ती अथवा संस्थेस विभागुन दिला जाणार नाही. पुरस्कार मरणोत्तर जाहीर करण्यात येणार नाही. केलेल्या कार्याचे सबळ पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. (उदा. वृत्तपत्रीय कात्रणे, प्रशस्तीपत्रे, चित्रफिती व फोटो, इत्यादी), अर्जदार युवक व युवतीने पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्ष क्रीयाशिल कार्यरत राहणार असल्याचे हमीपत्र देणे आवश्यक राहील. अर्जदार व्यक्तीचे कार्य हे स्वयंस्फुर्तीने केलेले असावे.(तसे हमीपत्र जोडावे), एका जिल्हात पुरस्कार प्राप्त करणारी व्यक्ती राज्यातील अन्य जिल्हात जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अधिकारी किंवा कर्मचारी तसेच विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र राहणार नाही. अर्जदाराने पोलीस विभागाने प्रमाणीत केलेला चारित्र्य दाखला देणे आवश्यक राहील.


संस्थांसाठी पात्रता निकष : पुरस्कार संस्थेस विभागुन दिला जाणार नाही. संस्थांनी केलेल्या कार्याचे सबळ पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. (उदा. वृत्तपत्र कात्रणे, प्रशस्तीपत्रे, चित्रफिती व फोटो, इत्यादी), अर्जदार संस्थेने पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्ष क्रीयाशिल कार्यरत राहणार असल्याचे हमीपत्र देणे आवश्यक राहील. अर्जदार संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १८६० किंवा मुंबई पब्लीक ट्रस्ट ॲक्ट १९५० नुसार पंजीबध्द असावी. अर्जदार संस्था नोंदणी झाल्यानंतर किमान पाच वर्ष कार्यरत असणे आवश्यक आहे.




# दरवाजे उघडे खुर्च्या रिकाम्या! हजेरी लावून गायब? मेहकरमध्ये भोंगळ कारभाराचा कळस!

जनसंचलन/मेहकर

येथील भूमी अभिलेख कार्यालयातील बेजबाबदारपणाचा कळस गाठला असून नागरिकांना अक्षरशः वेठीस धरले जात आहे. कार्यालयाची वेळ सुरू, दरवाजे उघडे; मात्र कर्मचारी खुर्च्यांवर नाहीत असे संतापजनक चित्र रोजच पाहायला मिळत आहे. जमिनीची मोजणी, फ ेरफार, नोंद दुरुस्ती आदी महत्त्वाच्या कामांसाठी ग्रामीण भागातून शेतकरी सकाळपासून रांगेत उभे असतात; पण ङ्कङ्कसाहेब आले नाहीतफ्फ किंवा थोड्या वेळात येतील अशी उत्तरे देत त्यांना ताटकळत ठेवले जाते. अनेक कर्मचारी हजेरी लावून गायब होत असल्याची चर्चा असून त्यामुळे शेकडो फाईल्स प्रलंबित पडल्या आहेत. नागरिकांचा वेळ, पैसा आणि



श्रम वाया जात असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण नेमके कुठे आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. राज्यभर मागण्यांसाठी आंदोलन सुरू असतानाही कार्यालयीन वेळेत गैरहजर राहण्याचे प्रकार संतापजनक आहेत. मेहकरमधील हा ङ्कभोंगळ कारभारफ तात्काळ थांबवून संबंधित कामचुकार कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अन्यथा नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा संतप्त शेतकऱ्यांनी दिला आहे. प्रशासन जागे होणार का? असा सवाल आता सर्वसामान्यांतून केला जात आहे

# जोरदार टक्कर अन् क्षणात सर्व संपलं! चिखलीत बोंद्रे ठार

जनसंचलन/ चिखली

चिखली-धाड रोडवरील साकेगावजवळ आज सकाळी सुमारे १० वाजताच्या दरम्यान भीषण अपघात होऊन दुचाकी चालकाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या अपघातात राजेश बोन्द्रे (वय ५५, रा. चिखली) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राजेश बोन्द्रे हे सकाळी आपल्या दुचाकीवरून साकेगाव येथील शेतात जात असताना समोरून येणाऱ्या पॅसेंजर अपेने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी जबरदस्त होती की बोन्द्रे गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तातडीने त्यांना चिखली येथील जवंजाळ हॉस्पिटलमध्ये दाखल



केले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. अपघातात अपे चालकही जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय, चिखली येथे पाठविण्यात आला आहे. या घटनेमुळे साकेगाव परिसरात संताप व्यक्त होत असून अपघातग्रस्त मार्गावरील वाहतुकीच्या बेफिकिरीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या प्रकरणी चिखली पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# डोणगावात क्रांतीवीर संत सेवालाल महाराजांची २८७ वी जयंती जल्लोषात

जनसंचलन/ डोणगाव

बंजारा समाजाचे आराध्य दैवत क्रांतीवीर संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती १५ फेब्रुवारी रोजी डोणगाव येथे अभूतपूर्व उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील प्रमुख चौक, सार्वजनिक स्थळे आणि ग्रामपंचायत कार्यालय परिसर भगव्या पताकांनी आणि घोषणांनी दुमदुमून गेला होता. सकाळी ध्वजपूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष शैलेशभाऊ सावजी यांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. शिवसेना (उबाठा) गटाचे निबाजी पांडव, भाजपा विद्यार्थी जिल्हाध्यक्ष विलास परमाळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन गाभणे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत सेवालाल महाराजांचा विचार समाजाला एकजुटीची ताकद देणारा आहे, असा सूर यावेळी उमटला. ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच



चरण पाटील आखाडे यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र कार्यक्रम पार पडला. उपसरपंच श्याम इंगळे, माजी सरपंच जुबेर खान व इतर मान्यवरांनी महाराजांना अभिवादन केले. नाईक अनिल राठोड, कारभारी सतीश राठोड व संदीप राठोड यांच्या परिश्रमातून सोहळा यशस्वी झाला. गावकरी आणि बंजारा समाजबांधवांच्या शिस्तबद्ध उपस्थितीमुळे डोणगावात भक्ती, ऐक्य आणि उत्साहाचे अनोखे चित्र पाहायला मिळाले.

# एकटी महिला, रात्रीची वेळ आणि आरोपीचा संतापजनक प्रकार! हॉटेलमध्ये घुसून गैरवर्तन; डोणगाव हादरले!

जनसंचलन/बुलढाणा

समृद्धी महामार्गालगत डोणगाव शेतशिवारात धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून एका महिलेच्या विनयभंगाची गंभीर घटना घडली आहे. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, द्वारकाबाई गजानन मुळे (वय ४७, रा. शेलगाव पार परिसर, डोणगाव, ता. मेहकर, जि. बुलढाणा) या समृद्धी महामार्गाजवळ पेट्रोल पंपासमोर हॉटेल महाराष्ट्र नावाने चहा-पाणी विक्रीचा व्यवसाय करतात. घटनेच्या वेळी त्या हॉटेलवर एकट्याच होत्या.दरम्यान, लक्ष्मण सोमटकर (वय अंदाजे ३५, रा. डोणगाव) हा हॉटेलमध्ये येऊन दारूची मागणी करू लागला. संबंधित महिलेने दारू विक्री करत नसल्याचे स्पष्ट सांगितल्यावर आरोपीने संतापून तिच्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप



आहे. त्याने महिलेचा हात धरून तिला जबरदस्तीने जवळ ओढले, अंगाला हात लावला तसेच ब्लाउजला हात घालून विनयभंग केला. झटापटीदरम्यान महिला खाली पडून जखमी झाल्याचेही तक्रारीत नमूद आहे.महिलेच्या आरडाओरडीनंतर आरोपी शिवीगाळ करत घटनास्थळावरून पसार झाला. त्यानंतर पीडितेने पतीसह डोणगाव पोलीस स्टेशन गाठून तोंडी फिर्याद दिली.या प्रकरणी भारतीय न्याय संहिता () कलम ७४, ११५(२) व ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार संजय घिके यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.समृद्धी महामार्ग परिसरात वाढत्या गुन्हेगारी प्रकारांमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आरोपीवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८